दिनांक : २७.०६.२०१९

**विषय : कोजागिरी (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी ई टेंडर करीता आयोजित प्रीबिड बैठकीचे इतिवृत्त..**

कोजागिरी कॅन्टीन (DAC) येथील भोजन व्यस्थेसाठी सन २०१९-२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई- टेंडर साठी प्रीबीड बैठक दिनांक २७.०६.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता पीएमबी बिल्डींग, तिसरा मजला येथील संस्थेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

१. ISG Hospitality Services Private Ltd., Pune
२. Annapurna Catering Services. Pune
३. Vaishali Caterers, Pune
४. Bharti Associates, Pune
५. Industrial Caterers, Pune
६. Ranjeet Services, Pune
७. Akshaya Caterers, Pune
८. Vaishali Caterers, Pune

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री सतीश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री सदाशिव पाटील, निबंधक
३. श्री देवराम शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण कक्ष
४. श्री विकास कटकधोंड, सहायक निबंधक
५. श्री अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted आहे किंवा कसे या बाबतचा मुद्दा Vaishali Caterers चे प्रतिनिधी श्री. व्ही.राम यांनी उपस्थित केला. | MSME चे प्रमाणपत्र जर भोजन व्यवस्था सेवेसाठी नोंदणी केली असेल तर EMD व Tender Fee परत करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. |
| २. | तीन वर्षाची Balance Sheet सादर केली तर CA चे Turnover Certificate ची आवश्यकता का आहे असा मुद्दा Vaishali Caterers चे प्रतिनिधी श्री. व्ही.राम यांनी उपस्थित केला. | Catering व्यवसायातील वार्षिक उलाढाल व सक्षमता स्पष्ट होण्यासाठी मागील ३ वर्षाचे C.A. चे Turnover Certificate आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. |

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ३. | लिफाफा क्र. ०२ मधील अनु. क्र. ०३ दरपत्रक अ-१ येथील एका व्यक्तीसाठी एक दिवसाचा एकूण दर याबाबत खुलासा करण्याबाबत Vaishali Caterers चे प्रतिनिधी श्री. व्ही.राम यांनी विचारणा केली. | लिफाफा क्र. ०२ येथे तपशिलामध्ये नमूद केल्यानुसार अ-१ येथे भोजन सेवेबाबतचा एका व्यक्तीसाठी एका दिवसाचा दर नमूद करावयाचा आहे. तसेच सदर दराचा बाब निहाय दर अ-२ मध्ये नमूद करावयाचा असल्याचे संस्थेकडून स्पष्ट करण्यात आले. |
| ४. | भोजन सेवेसाठी किमान प्रशिक्षणार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत Akshaya Caterers चे प्रतिनिधी श्री अक्षथ शेट्टी यांनी विचारणा केली. | अशा प्रकारे तरतूद करण्यात आली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. |
| ५ | Technical Bid उघडल्यावर त्याबाबत आम्हाला कसे कळणार असे Akshaya Caterers चे प्रतिनिधी श्री. अक्षथ शेट्टी यांनी विचारणा केली. | Technical Bid उघडल्यावर त्याचा Result वेबसाईटवर upload केला जातो. तो सर्व निविदादारांना पाहणेसाठी उपलब्ध राहील. |
| ६. | अनुभवाचे प्रमाणपत्र देण्यासाठी जेथे काम चालू आहे तेथील कंपनीशी केलेले कराराची प्रत जोडली तर चालेल का कारण बऱ्याच वेळेस काही कंपनी एकदा ठेका देतात व तसाच पुढे चालू ठेवतात व अनुभवाचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्याची शाश्वती नाही असे Akshaya Caterers चे प्रतिनिधी श्री. अक्षथ शेट्टी यांनी विचारणा केली. | तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र. ०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किमान १०० ते ३०० व्यक्तींसाठी दररोज शाकाहारी व मांसाहारी भोजनव्यवस्था किमान दोन वर्ष समाधानकारकरित्या चालविली असल्याचे किमान दोन संस्थेची सुस्पष्ट/तपशिलवार अद्यावत अनुभव प्रमाणपत्रे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. |
| ७ | फर्मच्या विविध सेवांसाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची ESIC व PF ची चलने एकत्रित पणे भरलेली असतात त्यामुळे स्वतंत्रपणे भोजनव्यवस्था कर्मचारी नमूद करता येत नाही असे ISG Hospitality Services Private Ltd यांचे प्रतिनिधी श्री. रोहित गुप्ता यांनी विचारणा केली. | त्याबाबत चे प्रमाणपत्र स्वयंसाक्षांकित व सोबत ESIC व PF ची चलनाच्या प्रती कर्मचारी यादीसह सादर करणे आवश्यक राहील. |
| ८ | Labour Licence सादर करणे बाबतची माहिती देण्याबाबत ISG Hospitality Services Private Ltd यांचे प्रतिनिधी श्री. रोहित गुप्ता यांनी विचारणा केली. | ठेका मिळाल्यानंतर यशदाच्या नावाने Labour Licence एक महिन्याच्या आत सादर करावे लागेल. सध्या चालू असलेल्या कराराअंतर्गत नमूना कॉपी निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ९ | TAN चे प्रमाणपत्र लागू आले का असे Vaishali Caterers चे प्रतिनिधी श्री. व्ही.राम यांनी विचारणा केली. | TDS साठी TAN आवश्यक असतो. तथापि TAN नसल्यास PAN Card प्रत सादर करणे आवश्यक राहील. |

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १० | तांत्रिक लिफाफा मधील अनु क्र. ३ नुसार Cash Cerdit Certificate ची Fresh Copy मिळणार नाही. असे Akshaya Caterers चे प्रतिनिधी श्री. अक्षथ शेट्टी यांनी विचारणा केली. | सदर Facility सुरु असल्यास तशा स्वरुपाचे बँकेचे सध्याचे पत्र व सोबत यापूर्वी Cash Credit मंजूर केल्याचे बँकेचे पत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. |

निविदा भरणे अगोदर संपूर्ण निविदेचे वाचन करुन, सर्व कागदपत्रे निविदेनुसार upload करावी. संस्थेच्या वतीने सर्व निनिदादारांच्या प्रतिनिधींना सूचना देवून बैठक समाप्त करण्यात आली.

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

विकास कटकधोंड
(सहायक निबंधक)

देवराम शेळके
(लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण)

सदाशिव पाटील
(निबंधक)

सतीश तडकसे
(वित्तीय सल्लागार)